साक्षीदार क्र **०४** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–प्रशांत ज्ञानेश्वर मुळे,
वय ३६ वर्ष, व्यवसाय–शेती
राह.चनोडा, ता.उमरेड, जि.नागपूर.

**सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत शपथेवर सुरू**

१. घटनेच्या दिवशी मी व माझी पत्नी असे उमरेड येथुन आरोपी लोकेश यांच्या ॲटोमध्ये बसुन चनोडा येथे जात होतो. त्यावेळी समोरून एकाच वेळेस चार–पाच डुक्करे ॲटोसमोर आडवे आली त्यामुळे ब्रेक मारायला वेळ मिळाला नाही व ॲटो पलटला. त्यानंतर मी ॲटो सरळ करून आत बसलेल्या लोकांना बाहेर काढले. असे काही झाले नाही की, ॲटो हा भरधाव वेगात असल्याने पलटला.

**सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.**

२. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या ॲटोमध्ये मी, प्रभावती उर्फ भारती कळसकर असे बसलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, सदर ॲटोमध्ये जात असतांना आरोपीचा ॲटो हिवरा हिवरी गावाजवळ पलटला व त्यामुळे प्रभावती कळसकर ही ॲटोखाली दबली व मीसुध्दा बाहेर फेकलो गेलो व त्यामुळे प्रभावती कळसकर हिच्या डोक्याला मार लागला होता व रक्त निघत होते. हे म्हणणे खरे आहे की, प्रभावती कळसकर हिच्या डोक्याला मार लागल्यामुळे ती जाग्यावरच मयत झाली. हे म्हणणे खरे आहे की, सदर अपघातामध्ये माझ्या पत्नीला मार लागला होता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी लोकेश यालासुध्दा मार लागला होता. हे म्हणणे खरे नाही की, ॲटो हा भरधाव वेगात असल्यामुळे आरोपीला ब्रेक लावता आला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने त्याच्या ताब्यातील ॲटो हा भरधाव वेगात चालविला व पलटी केला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझा नातेवाईक आहे.

३. आता मला माझ्या बयाणातील **अधोरेखांकित भाग अ** वाचुन दाखविण्यात आला तो पोलिसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी ओळखीचा असल्यामुळे त्याला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे. आता मला माझ्या बयाणातील **अधोरेखांकित भाग अ** वाचुन दाखविण्यात आला तो पोलिसांनी माझ्या

सांगण्याप्रमाणे लिहीलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी ओळखीचा असल्यामुळे त्याला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे. मी व आरोपी एकाच गावात राहतो व ओळखीचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**आरोपीतर्फे ॲड.श्रीमती एम.ए.भुरे यांनी उलटतपास नाकारला.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा.

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि.१३.११.२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड